पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी,

पुणे – ४११ ०१७

जा.क्र.ड/१३/कावि/ ०१ / २०१९

दिनांक– ०१/ ०१ / २०१९

प्रति,

मा.श्री/श्रीमती ----------------------------

-------------------------------------------

-------------------------------------------

विषय :- ड प्रभाग समितीची मासिक सभा कार्यपत्रिका क्र. १० दिनांक ०४/०१ /२०१९

महोदय,

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१९ ची मासिक सभा ड क्षेत्रिय कार्यालयाचे "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे शुक्रवार दिनांक ०४/०१/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली आहे.

सदर सभेमध्ये सोबत जोडलेल्या कार्यपत्रिकेप्रमाणे कामकाज करण्यात येईल. सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

**सही/-**

**प्रशासन अधिकारी तथा**

**सचिव, सभाशाखा**

ड क्षेत्रीय कार्यालय,पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी, पुणे-१७

सोबत - कार्यपत्रिका क्र: १०

दिनांक:- ०४ /०१ /२०१९

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे-१७

## ड प्रभाग समिती,

### कार्यपत्रिका क्र. १०

दिनांक :०४ /०१/२०१९ वेळ दुपारी १२. ०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१९ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०४/०१/२०१९ रोजी दुपारी १२.०० वा. रहाटणी येथील ड क्षेत्रीय कार्यालयाचे "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजित केलेली आहे. सभेमध्ये खालीलप्रमाणे कामकाज होईल.

१) मागील सभा कार्यपत्रिका क्र. ७ माहे ऑक्टोबर २०१८ व कार्यपत्रिका क्र. ८ माहे नोव्हेंबर २०१८ व कार्यपत्रिका क्र. ९ माहे डिसेंबर २०१८ च्या सभांचे सभावृत्तांत कायम करणे

२) प्रभाग क्र. २५ वाकड चौधरी पार्क येथील हॉरिझोन सोसायटी व स्काय लाईन सोसायटी शेजारील रस्ता हा तिन्ही बाजूने एकत्र आलेला आहे. या ठिकाणाला लँडमार्क नाही तसेच येथील नागरीकांना पत्ता सांगण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. येथील नागरीकांनी लेखी स्वरुपात मागणी केली असुन या चौकाचे नामकरण "छत्रपती संभाजी राजे चौक" असे करण्याबाबत

३) प्रभाग क्र. २६ वाकड पिंपळे निलख मौजे वाकड सर्व्हे नं.२५७ छत्रपती चौक कस्पटेवस्ती रस्त्याकडून मानकर चौकाच्या दिशेने जात असताना डावी बाजूस जी कॉलनी आहे त्या कॉलनीस "साबळे कॉलनी" कस्पटे वस्ती हे नाव देणेबाबत

४) प्रभाग क्र. २५ वाकड डांगे चौक रस्त्यावर कळमकर वस्ती ही गेल्या दोन पिढया वसलेली असुन सदर परिसराची कळमकर वस्ती अशी ओळख आहे. सदरच्या परिसरातील लोकांकडून कोणताही कार्यक्रम तसेच पत्रव्यवहार व शासकीय कामाकरीता जवळची खूण म्हणुन कळमकर वस्ती असा उल्लेख केला जातो. म्हणुन सदर सर्व्हे नं. १७३ या जागेस "कळमकर वस्ती" असे नामकरण करणेबाबत

५) पिंपळे सौदागर येथील गोविंद यशदा चौक ते विश्वशांती कॉलनी पर्यंत रिंग रेल्वे स्टेशनसाठी आरक्षित असलेल्या आरक्षण क्र. ३७१, स.नं. ७० ते ७२, १४४ ते १४६, १४९ पै. जागेत ९.० मीटरचा रस्ता विकसित करणेबाबत माहे ऑगस्ट २०१८ च्या सभेत ठराव पारीत केलेला असुन सदर ठरावाऐवजी पिंपळे सौदागर येथील गोविंद यशदा चौक ते आरक्षण क्र. ३७१ लगत विश्वशांती कॉलनी रस्त्यापर्यंत ९.०० मीटरचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०५ नुसार घोषित करणेबाबत

६) "संत शिरोमणी श्री सावतामाळी शेतकरी आठवडा बाजार" अभियानांतर्गत सर्व्हे नं. ६० मेन बस स्टॉप, पाण्याच्या टाकीजवळ, पिंपळे निलख येथे दर गुरुवारी दुपारी ३ ते रात्री ९ या वेळेत आठवडा बाजार भरविण्यास महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय, पुणे यांस मनपाने निश्चित केलेल्या आठवडे बाजार धोरणातील अटी शर्तीनुसार परवानगी देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेबाबत

७) मा. सभापती ड प्रभाग समिती यांचे सुचनेनुसार करावयाचे कामकाज

सही/-

**जा.क्र.:डक्षे/१३/कावि/ ०२ /२०१८**
**दि. ०१/ ०१ /२०१८**

**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव, सभा शाखा,**
**ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी, पुणे – १७**